# जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ
## दिनांक ३०/०५/२०११ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र सभेचे
# * ईतिवृत्त*

| अ.क्र. | मुद्या कोणी मांडला | विषय | संबंधित यंत्रणेचे नांव | (अ) दिनांक ३०.०५.२०११ पर्यतची थोडक्यात सद्यस्थिती | निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाव्यवस्थापक जिउके यवतमाळ | मागील सभेचे इतिवृत्त पारीत करणे | जिउकें यवतमाळ | दिनांक ०७/०२/२०११ रोजी सपंन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र सभेचे इतिवृत्त संबंधितांना दि. १९ /०३/२०११ ला पाठविण्यात आले. सदर इतिवृत्तासंबधी आक्षेप नसल्याने सभागृहामध्ये इतिवृत्तास मान्यता देण्यात यावी. | ईतिवृतास मान्यता देण्यात आली |
| २ | विदर्भ चेंबर ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज, यवतमाळ | एमआयडीसी वणी क्षेत्रात स्वतंत्र फिडर बसविणे बाबत | अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता MSEDCL यवतमाळ<br><br>अधिक्षक अभियंता MSETCL अमरावती | **अ)** दारव्हा औद्योगिक क्षेत्रातील ११ के. व्ही. फिडर चे काम दि. १५.०३.२०१० रोजी पुर्ण झाले असुन फिडर म.रा.वि.वि.म कंपणी मर्या. यांना सोपविण्यात आले.<br>**वणी व घाटंजी येथिल एमआयडीसी मध्ये स्वतंत्र ११ के.व्ही .फिडर टाकण्याबाबत चे काम "१.३% सुपरव्हीजन चार्जेस " फक्त आकारुन मटेरीयलसह एमआयडीसी स्वत: करणार असल्यामुळे सदर काम गतिशिल पणे हाती घेउन त्यांचेव्दारेच पुर्ण करण्यांत येणार आहे व त्या कामाचे सुपरव्हिजन म.रा.वि.वि कंपणी चे प्रतिनिधी करतील त्यामुळे काम पुर्ण होताच तसा अहवाल पाठविण्यात येईल असे महाराष्ट् राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या चे माहिती अधिकारी पांढरकवडा विभागाने त्यांचे पत्र क्र. अ/पांढरकवडा /१३६९ दि.१८ ऑगष्ट - २०१० नुसार कळविले**<br>म.औ.वि.म (अभियांत्रिकी शाखा) चे अधिका-यानी सभेत सांगीतले की, M/s. Crompton Greaves Company. ला याबाबत निविदा मंजूर केल्या असुन त्यांचे मार्फत डिसेंबर-२०१० अखेर वणी व घाटंजी येथिल एमआयडीसी मध्ये स्वतंत्र ११ के.व्ही. फिडर टाकण्याचे काम पुर्ण होईल. .<br>(ब) याबाबत फॅक्टरी टेस्टींग दि.२९/०१/२०११ ला झालेली आहे व ब्रेकर्स दि. १०/०२/२०११ पर्यत साईटवर पोहचेल असे अपेक्षित आहे. उर्वरीत काम मार्च-२०११ पर्यत पुर्ण होईल असे . मा.औ.वि.म चे अधिका-यानी सभेत सांगीतले. | या बाबत MSETCL कडुन Test Division यांचेकडुन Testing करुन दोन्ही फिडर चार्ज करण्याची कार्यवाही सुरु आहे. असे MSETCL चे अधिका-यांनी सभेत सांगीतले.<br>त्यावर सदर विषय हा २००३ पासुन प्रलंबित आहे. सदर काम हे ८ वर्षापासुन सुरु आहे ते पुर्ण का होत नाही. या करीता एमआयडीसी कारणीभुत आहे असे सदर काम हे MIDC ने Effectively करायला पाहिजे असे विदर्भ चेंबर्स ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज चे अध्यक्ष श्री. महेंद्र दर्डा यांनी सभेत सांगीतले.<br>त्यावर मा. अध्यक्षांनी विचारले की सदर काम हे किती दिवसात पुर्ण होईल असे विचारले असता . सदर काम हे १५ दिवसात पुर्ण होईल असे संबधित अधिका-यांनी सभेत सांगीतले. |

| अ.क्र | मुद्या कोणी मांडला | विषय | संबंधित यंत्रणेचे नांव | (अ) दिनांक ३०.०५.२०११ पर्यतची थोडक्यात सद्यस्थिती | निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| ३ | एमआयडीसी | जिल्हा उद्योग केंद्राची, गोंधनी रोड येथील जागा मऔविम द्वारा वाणिज्यीक कार्याकरीता वापरा सबंधात प्रस्ताव | पोलीस अधिक्षक, यवतमाळ<br><br>SDO यवतमाळ<br><br>मा. उपजिल्हाधिकारी (महसुल) यवतमाळ | अ) सर्व्हे नं. २ भु.मा.क.क्र . १७ , मौजा उमरसरा येथिल ६०.५४ हे. आर. (६०.९० चौरस मि.) जागा जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ ऐवजी महाराष्ट् औद्योगिक विकास महामंडळ ,यांचे नावे करण्याबाबत उप- विभागीय अधिकारी, यवतमाळ यांनी दि. ०५.०४.२०१० रोजीचे आदेशानुसार परवानगी देण्यात आलेली आहे.<br><br>सदर जागेच्या मागणीसंबंधी पोलीस खात्याकडुन सविस्तर प्रस्ताव दि. ७/१०/२००८ व १६/०८/२००८ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला असुन उपजिल्हाधिकारी (महसुल) यांचे कडुन सदर प्रस्ताव मा. प्रधान सचिव (उद्योग) यांचेकडे पाठविण्याकरीता त्वरीत कार्यवाही करण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देश दिले.<br><br>उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दि.२२/०२/२००२ नुसार जिल्हा उद्योग केंद्राचे स्थलांतरण उद्योग भवन येथे करतांना काही अटी नमुद केलेल्या आहेत. सदर पत्राची छायांकीत प्रत सोबत जोडलेली आहे. शासनाच्या अटी नुसार सदर भुखंड वाणिज्यीक तत्वावर विकसीत करुन निवळ उत्पादनाच्या रक्कमेतुन<br><br>जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाचे देखभाल व दुरुस्तीसाठी वापर करावयाचा असल्यामुळे प्रकरणी शासनाची मान्यता घ्यावी लागेल. या उपरान्त पोलीस विभागास जागा द्यावयाची झाल्यास तसा प्रस्ताव संबंधीत विभागाकडुन शासन उद्योग , उर्जा व कामगार विभागास सादर करण्यात यावा असे प्रादेशिक अधिकरी, एमआयडीसी, अमरावती त्यांचे पत्र क्र. २०१०२८०० ि दि. १४/०९/२०१० नुसार जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाला कळविले आ**हे**<br><br>पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांनी सदरहु जागा मागणीच्या एमआयडीसीला दिलेल्या अगोदरच्या प्रस्तावाचा उल्लेख करुन त्याबाबतचे अर्ध शासकीय पत्र S.P. Office ने मा. जिल्हाधिकारी यांना त्वरीत सादर करावे . त्यानुसार मा . जिल्हाधिकारी तसा सुधारीत प्रस्ताव CEO, MIDC यांना पाठवतील असे सभेत ठरले.<br><br>पोलीस अधिक्षक, यवतमाळ , यांचे पत्र क्र. पली-१, /वडगांव रोड/जागा/२०१०२१२४३२ दि. १७ सप्टेबर५२०१० नुसार कळविले आहे की, नवनिर्मीत पो.स्टे. वडगांव रोड यवतमाळ करीता जिल्हा उद्योग केंद्राची रिक्त असलेली ईमारत व रिक्त जागा उपलब्ध करुन देणे बाबत .या संबधाने अधिवेशनात मा. श्री. मदन येरावार आमदार यवतमाळ विधानसभा क्षेत्र व मा.श्री. संजय राठोड विधानसभा सदस्य यांनी कपात सुचना उपस्थित केली आहे त्या संबधाने शासनास पत्रव्यवहार करणे क्रमप्राप्त आहे.<br><br>तरी वडगाव रोड पोलीस स्टेशनकरीता गोधनी रोड यवतमाळ येथील जिल्हा उद्योग केंद्राची ईमारत व जागा पोलीस स्टेशन करीता पोलीस विभागास त्वरीत हस्तांतरीत करुन द्यावी असे या कायार्लयास कळविले आहे.<br><br>तसेच प्रादेशिक अधिकारी , म.ओ.विम. यांनी दि. १६/०९/१० नुसार कळविले आहे की, मोजा , उमरसरा ता.जि. यवतमाळ येथील सर्व्हे नं.२ गट नं. १७ मधील जमीनीपैंकी ०..५४ हे.आर. जमीन म.औ.वि.म यांचे नावाने करण्याबाबत उपविभागीय अधिकारी,यवतमाळ यांनी आदेश निर्गमित केलेले आहेत . त्यामुळे सदर फेर फार नोंद ७/१२ ला करुन अद्यावत ७/१२ प्रत पुरविण्याची विनंती आहे.<br><br>गोधणी रोड वरील जिल्हा उद्योग केंद्र, इमारतीचे भुखंडावर महामंडाळाव्दारे विकास करण्याचे प्रस्तावित असल्यामुळे पोलीस विभागास सदरची जागा देता येणार नाही असे म.ओ.वि.म चे अधिका-यांनी सभेत सांगीतले. त्यावर मा. अध्यक्षांनी पोलीस विभागास तसे कळविण्याचे आदेश म.औ.वि.म. व जिल्हा उद्योग केंद्राला दिले.<br><br>जिल्हा उद्योग केंद्राने दिनांक २५.०५.२०११ चे पत्रानुसार पोलीस विभागास कळविलेले आहे | गाोधणी रोड वरील जिल्हा उद्योग केंद्र, इमारतीचे भुखंडावर महामंडाळाव्दारे विकास करण्याचे प्रस्तावित असल्यामुळे पोलीस विभागास सदरची जागा देता येणार नाही असे मागील जिल्हा उद्योग मित्र सभेत एमआयडीसीचे अधिका-यांनी सभेत सांगीतले.<br><br>यावर दुस-या जागेकरीता प्रस्ताव पोलीस विभागाने द्यावा असे मा. अध्यक्षांनी सभेत सुचविले. |

| क्र | मुद्या कोणी मांडला | विषय | संबंधित यंत्रणेचे नांव | (अ) दिनांक ३०.०५.२०११ पर्यतची थोडक्यात सद्यस्थिती | निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| ४ | विदर्भ चेंबर ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्री, यवतमाळ | वणी एमआयडीसी क्षेत्रात नविन भुखंड उपलब्ध करुन देणे बाबत. | प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती | १) अतिरिक्त वणी औद्योगिक क्षेत्राकरीता मौजा वणी येथील उपलब्ध ४.८१ हे. जागेची मागणी करण्यात आली होती. सदर जागेची मोजणी ता. निरीक्षक भुमी अभिलेख,वणी यांचे कडुन करण्यात आली. जागेचे प्रस्ताव तयार करण्याकरीता लागणारे आवश्यक कागदपत्र पुरविण्याबाबत तहसिलदार ,वणी यांना कळविण्यात आलेले आहे. त्यांचेकडुन कागदपत्रे प्राप्त होताच शासन जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी , यवतमाळ यांचे कडे सादर करण्यात येईल असे प्रादेशिक अधिकारी ,एमआयडीसी, अमरावती यांनी त्यांचे पत्र क्र. २०१०२८०० दि. १४/०९/२०१० नुसार जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाला कळविले आहे.२) भुखंडाची सद्यस्थिती पुढील प्रमाणे :-<br><br>१) पाडण्यात आलेले एकुण भुखंड :- ९५, (२) वाटप करण्यात आलेले भुखंड :- ९५, (अ) उत्पादनात गेलेले भुखंड:- ४८, (ब) उत्पादनात जावुन बंद पडलेले:- ०३, (क) बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतलले:- ३७, (ड) बांधकाम सुरु असलेले भुखंड: ०७<br><br>३) ३ ते ५ वर्ष पुर्ण होवुनही रिक्त असलेले भुखंड: - १२ (नोटीसेस देण्यात आले असुन भुखंड सरकार जमा करण्याची कार्यवाही चालु आहे)<br><br>अ) मुदतवाढ मंजूर करण्यात आलेले :- ०६<br><br>ब) मुदतवाढीचा प्रस्ताव प्राप्त झालेले :- ०६<br><br>क) हस्तातरण झालेले :- ११<br><br>ड) कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेले:- ०७<br><br>ई) महामंडळाने पंचनामाअंती ताब्यात घेतलेले:- ०२<br><br>४) वणी औद्योगिक क्षेत्रात भुखंडाकरीता On lineअर्ज-प्राप्त- १०<br><br>( शासकीय जमिन हस्तांतरणा बाबत कार्यवाही चालु आहे)<br><br>५) प्राप्त अर्जानुसार केलेली कार्यवाही - भुखंडाकरीता ऑन लाईन अर्ज केलेल्या अर्जदारांना भूखंड वाटपाकरीता उपलब्ध नसल्याचे पत्र देण्यात येवुन प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहे. असे प्रादेशिक अधिकरी, एमआयडीसी, अमरावती त्यांचे पत्र क्र. २०१०२८०० दि. १४/०९/२०१० नुसार जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाला कळविले आहे.<br><br>ब) MIDC ही स्वत: Proffesionally Managed campany असल्यामुळे त्यांनी त्वरीत तहसिलदार वणी यांना संपर्क साधुन व्यवसायीक कुशलतेने पाठपुरावा करुन प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारे कागदपत्रे प्राप्त करावे असा निर्णय घेण्यात आला.<br><br>Area Manager ,MIDC व प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी ने त्यांचे जिल्हा कार्यालयाकडे २५०० चौ.मि. भूखंड मागणीचे कुठलेही अर्ज On Line o Off Line प्रलंबित नसल्याचे सभेत कबुल केल्यानुसार तसे लेखी पुढील सभेत समितीपुढे सादर करावे अध्यक्ष औद्योगिक संघटना वणी यांनी २००६ ला मऔविमचे विभागीय कार्यालयाकडुन प्राप्त केलेल्या यादीत २५०० चौ.की. भुखंड पर्यतची नस्ती औद्योगिक क्षेत्रात मागणी असलेल्या एकुण २१ घटकांची यादी अद्यापही प्रलबित असल्याचे सभीतीच्या निदर्शनास आणुन दिले त्या २१ प्रकरणांची सद्यस्थिती पुढील सभेत समीतीपुढे सादर करावी व मऔविमच्या १९९१ च्या परिपत्रकानुसार महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या समिती या किती सभा झाल्या याची माहिती सादर करावी.<br><br>**(ब)** एरीया मॅनेजर, एमआयडीसी ने ४.८१ हेक्टर जागेचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सांगीतले. यावर म.औ.वि.म. चे अधिका-यांनी सांगीतले की या कामाकरीता सर्व्हे अर ला प्रतिनियुंक्त केले आहे. सदर काम हे दि. १५.०२.२०११ पर्यत पुर्ण करण्यात यावे असे मा.अध्यक्षांनी सांगीतले. | अतिरीक्त वणी औद्योगिक क्षेत्राकरीता वणी येथील ४.८१ हे. जागेची मागणी प्रस्तावित करण्यात आली होती. तहसिलदार वणी यांचेकडुन परिपुर्ण माहिती प्राप्त झाल्याशिवाय पुढील कार्यवाही करता येणे शक्य नाहे असे प्रादेशिक अधिकारी, म.ओ.वि.म यांनी सभेत सांगीतले.<br><br>यावर सदर विषय हा १० वर्षापासुन प्रलबित आहे. सदर जागा ही Govt. Land आहे फक्त ताबा घेवुन प्लॉट वाटप करावयाचे आहे .याकरीता एवढा कालावधी लागायला नको . असे विदर्भ चेंबर्स ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज चे अध्यक्ष श्री. महेंद्र दर्डा यांनी सभेत सांगीतले.<br>यावर मा. अध्यक्षांनी पुढील सभेत झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सादर करावा. असे सुचित केले. |

| अ.क्र | मुद्या कोणी मांडला | विषय | संबंधित यंत्रणेचे नांव | (अ) दिनांक ३०.०५.२०११ पर्यंतची थोडक्यात सद्यस्थिती | निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| ५ | अध्यक्ष विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज, यवतमाळ | मारेगांव औद्योगिक क्षेत्राबाबत | प्रादेशिक अधिकारी, मऔविमं., अमरावती | मारेगांव लघु औद्योगिक क्षेत्राकरीता मौजा कन्हाळगांव येथील १०.४५ हे. जमीन संपादीत करण्यात आलेली होती. संपादीत जमीनीच्या मालकांनी मोबदला रक्कम स्विकारली नाही व त्यांनी न्यायालयात दावे दाखल केलेले आहे. औद्योगिक क्षेत्राच्या हददीच्या खुणा मोक्यावर नसल्लयामुळे नव्याने औद्योगिक क्षेत्राची हदद कायम करणेबाबत ता. निरीक्षक भुमीअभिलेख, मारेगांव यांना मोजणी शुल्काबाबत कळविण्यात आलेले आहे. परंतु किती मोजणी शुल्क भरावे लागणार याबाबत संबधीत कार्यालयाने (तालुका निरिक्षक भुमिअभिलेख) अद्याप पर्यत कळविलेले नाही. याबाबत पाठपुरावा केला असता ७/१२ उतारे सादर केल्यानंतरच मोजणी शुल्क कळविण्यात येईल असे असे प्रादेशिक अधिकरी, एमआयडीसी, अमरावती त्यांचे पत्र क्र. २०१०२८०० दि. १४/०९/२०१० नुसार जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाला कळविले आहे.<br><br>**(ब) MIDC ही Proffesinally Managed कंपनी असुन सुध्दा मंद गतीने एखाद्या शुल्लक गोष्टीचा पाठपुरावा न करता तसेच या मुद्याबाबत संदर्हु जागेचे ७/१२ उतारे सादर करण्यास विलंब करुन वेळकाढुपनाचे धोरण अजमावते या बाबत जिल्हा उद्योग मित्र समीतीने असमाधान व्यक्त केल्याचा निर्णय प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी ला जिल्हा उद्योग केंद्र ,यवतमाळ यांना कळवावा असे ठरले.**<br><br>या बाबत काही शेतक-यांनी त्यांची संपादीत केलेली जमीन परत करण्याची मागणी केली. त्याबाबत योग्य निर्णय होताच ७/१२ उतारे प्राप्त करुन संयुक्त मोजणीचे काम हाती घेण्यात येईल असे म.औ.वि.म. अधिका-यांनी कळविलें.<br><br>या बाबत काही शेतक-यांनी त्यांची संपादीत केलेली जमीन परत करण्याची मागणी केली. त्याबाबत योग्य निर्णय होताच ७/१२ उतारे प्राप्त करुन संयुक्त मोजणीचे काम हाती घेण्यात येईल असे म.औ.वि.म. अधिका-यांनी सभेत सांगीतले एकुण ३४ अर्ज भुंखड मागणीचे असलयांचे सांगीतलें<br><br>तसेच सदर Demarcation चे काम हे एक महिण्यात पुर्ण होईल असे म.औ.वि.म चे अधिका-यांनी सभेत सांगीतले. त्यानुसार कालमर्यादा पाळावी असे मा. अध्यक्षांनी निर्णयात सांगीतले. | मारेगांव औद्योगिक क्षेत्राकरीता भुसंपादनाची कार्यवाही व्हायची आहे असे प्रादेशिक अधिकारी ,मओविम, अमरावती यांनी सभेत सांगीतले. त्यावर २५ वर्षापासुन सदर जागा भुसंपादित आहे असे विदर्भ चेबर्स ऑफ कॉमर्स यवतमाळचे अध्यक्ष यांनी सभेत सांगीतले .<br><br>यावर म.ओ.वि.म. चे अधिकारी यांनी सांगीतले की, शेक-यांच्या कोर्टात केसेस चालु आहे. काही शेत क-यांनी संपादित केलेली जमीन परत करण्याची मागणी केली आहे. याबाबत योग्य निर्णय होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सभेत सांगितले. श्री. चोधरी प्रादेशिक अध्किारी, एमआयडीसी, शयांनी SDO वणी यांची भेट घेतली असुन जागा मागीतलेली आहे. परंतु अजुन पावेतो SDO वणी यांचे कडुन पत्र प्राप्त झालेले नाही.<br><br>यावर मा. अध्यक्षानी पुढील सभेत संपूर्ण अहवाल सादर करावा अशा सुचना दिल्या. |

| अ.क्र | मुद्या कोणी मांडला | विषय | संबंधित यंत्रणेचे नांव | (अ) दिनांक ३०.०५.२०११ पर्यतची थोडक्यात सद्यस्थिती | निर्णय | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | विदर्भ चेंबर ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असो. यवतमाळ | प्रस्तावित पांढरकवडा एमआयडीसी बाबत | प्रादेशिक अधिकारी, मऔविमं, अमरावती<br>आणि<br>कार्यकारी अभियंता MSEDCL पांढरकवडा | ( अ) पांढरकवडा लघु औद्योगिक क्षेत्रासाठी मोजे डोगरगाव , ता. केळापुर येथील एकुण २८.९६ हेक्टर शासकीय जमीन म.औ.वि.म ला विकसीत करण्याकरीता कक्ष अधिकारी महसुल व वनविभाग यांनी त्यांचेकडील ज्ञापन क्र. जमिन ४७०७ /प्र.क्र..९८/ज-८ महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई दि. ४/७/०७ नुसार शासन परिपत्रक दि. ३/११/१९९३ मधील तरतुदीनुसार नियमित अटी व शर्तीवर उद्योग विभागास अधिहस्तांरीत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार जागेच्या ताब्यासंबधी मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडुन २०/१०/२००७ जा आदेश परीत झालेत व त्यानुसार २८.९६ हेक्टर शासकीय जमिनीचा ताबा तहसीलदाार केळापूर यांचेकडुन दि. १७/११/०७ रोजी एमआयडीसी ने घेतला आहे.<br>प्रस्तावित पांढरकवडा एमआयडीसी क्षेत्राची जमीन ही वन विभागाची असल्याची वन विभागाने म्हटल्याचे उप अभियंता एमआयडीसी यांनी सभेत सांगीतले सदर जमीन ही C-Class जमीन वन विभागाचीच असुन एमआयडीसी ने त्यावर कोणतीही कार्यवाही करु नये असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेत. तसेच सदर जमीनीची उप विभागीय अधिकारी, पांढरकवडा यांनी आपल्या स्तरावरुन शहानिशा करुन जागा प्रत्यक्ष कोणाच्या मालकीची आहे याबाबत कळवावे व उप अभियंता एमआयडीसी यवतमाळ यांनी उप विभागीय अधिकारी यांच्याशी याबाबत संपर्क साधुन प्रस्ताव विभागीय वन विभाग, भोपाळ यांना ७ प्रतीत पाठविण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देश दिले होते.<br>तसेच मागील सभेमध्ये मा.अध्यक्षांनी सुचविल्यानुसार E-Class ची १०० एकरची जागा देण्याबाबत सांगीतले होते त्यानुसार E-Class च्या जमीनी बाबतचा प्रस्ताव प्रादेशिक अधिकारी ,अमरावती यांनी सादर करावा असे सभेत मा.अध्यक्षांनी सुचविले.<br>**प्रस्तावित पांढकवडा एमआयडीसी क्षेत्राबाबत २८.९६ हेक्टर वनखात्याची जमीन आहे. याबाबत दि. २७/११/२००९ रोजी मा. मंत्री महोदय श्री. मोघे साहेब यांनी पांढरकवडा औद्योगिक क्षेत्राबाबत सभा घेतली असता सदर प्रकरणाबाबत व्यक्तीशः मा. वनमंत्री यांचेशी चर्चा करुन याबाबत पुढील कार्यवाही करु असे सुचविले .**<br>**प्रस्तावित पांढरकवडा एमआयडीसी क्षेत्राबाबत २८.९६ हेक्टर जागा वनखात्याची जमीन आहे. या जागेबातचे Notification झाले आहे काय ? या बाबतची माहिती प्रादेशिक अधिकारी यांनी मंत्रालयाकडुन प्राप्त करावी असे मागील सभेत अध्यक्षांनी सूचविले.**<br>**ता. पांढरकवडा (केळापुर) येथे १०० हे. पेक्षा जास्त सरकारी जमीन उपलब्ध होवु शकेल काय ? याबाबत संबधीत विभागाशी संपर्क व पत्र व्यवहार करुन शोध घेण्यात आला परंतु केळापुर तालुक्यात ई-क्लास सरकारी जमीन उपलब्ध नाही असे तहिसलदार, केळापुर यांनी कळविलेले आहे असे प्रादेशिक अधिकरी, एमआयडीसी, अमरावती त्यांचे पत्र क्र. २०१०२८०० दि. १४/०९/२०१० नुसार जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाला कळविले आहे.**<br>MIDC ने मंत्रालयातील ़Director; ,Archieve मधुन सदहुं २८.९६ हेक्टर व वन खत्याच्या जमीनीच्या Notification ची प्रत प्राप्त करुन त्वरीत त्यांचे मुख्यालयाचे मदतीने सादर करावी असा निर्णय घेण्यात आला.<br>**व**न खात्याच्या जमीनीचे निर्वणीकरण बाबतची प्रत मंत्रालयातुन प्राप्त झालेली नाही . आता वनविभाग पांढरकवडा व उपविभागीय कार्यालय यांचे कडुन सदरची प्रत प्राप्त करण्याचे प्रयत्न सुरु आहे. असे प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.म.अमरावती यांनी कळविले आहे.<br>त्यावर मा.अध्यक्षांनी या करीता पर्यायी जागा म्हणुन पिंपरी मांगुर्डा रोडवर ५८ हेक्टर ची E-class जागा व तसेच केळापुर समोरील ढोकी येथे १६ एकरची E-class जागा मिनी एमआयडीसी करीता उपलब्ध होउ शकते याकरीता त्यांनी पांढरकवडा तहसीलदारांना पुढील कार्यवाही साठी भेटावे असे मा. अध्यक्षांनी सभेत एमआयडीसीचे विभागीय अधिका-यांना सूचना दिल्या. | पांढरकवडा औद्योगिक क्षेत्राकरीता असलेली जागा ही Forest Deptt. ची असल्यामुळे त्यावर काहीही करता येत नाही असे प्रादेशिक अधिकारी , एमआयडीसी, यांनी सभेत सांगीतले .<br>यावर मा.अध्यक्षांनी नविन जागा शोधावी असे सुचविले व तसेच याबाबत तहिसलदार यांना भेटुन पाठपुरावा करावा असे अध्यक्षांनी सुचित केले . यावर प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी यांनी सांगीतले की याबाबत SDO साहेबाची भेट घेतली असुन जागेबाबत पाठपुरावा सुरु आहे. | |

| अ.क्र | मुद्या कोणी मांडला | विषय | संबंधित यंत्रणेचे नांव | (अ) दिनांक ३०.०५.२०११ पर्यंतची थोडक्यात सद्यस्थिती | निर्णय |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | एमआयडीसी औद्योगिक संघटना<br>आणि<br>विदर्भ चेंबर ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज यवतमाळ | अतिरिक्त एमआयडीसी यवतमाळ क्षेत्रामध्ये भुखंड उपलब्ध करुन देण्याबाबत | प्रादेशिक अधिकारी, मऔविमं , अमरावती | (अ) **यवतमाळ** येथील विशेष आर्थीक क्षेत्राकरीता २०८ हेक्टर जागेचे नोटीफिकेशन झालेले आहे. त्यांनतर २०८ हेक्टर ऐवजी १०८ हेक्टर विशेष आर्थीक क्षेत्र विकसीत करण्याचे ठरले. १०८ हेक्टर चे नोटीफिकेशन प्राप्त झालेले नाही. सदर नोटीफिकेशन प्राप्त झाल्यानंतर शिल्लक असलेल्या जागेत लहान भूखंड पाडण्याबाबतचा प्रस्ताव नियोजन विभागाकडे सादर करुन मंजूरीनंतर वाटप करणेची कार्यवाही करण्यात येईल. तसेच यवतमाळ धामणगांव रोड वर बाभुळगांव तालुक्यात नविन एमआयडीसी करीता २० कि.मि. पर्यंत रोड लगतची १०० हेक्टर जागेची पहाणी करावी व तसा प्रस्ताव तयार करावा येथील एमआयडीसी मधील उद्योजकांना बेंबळा धरणा मधील पाणी सुध्दा उपलब्ध होईल असे सुध्दा मा. अध्यक्षांनी सभेत सुचविले जागेबाबत ७/१२ करीता तहिलदारांना पत्र देण्याचे निर्देश दिले होते . मागील दि. १६/११/२००९ रोजी झालेल्या सभेमध्ये अध्यक्षांनी सुचविल्यानुसार , महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद,एमआयडीसीचे अधिकारी व असोशिएशनचे पदाधिकारी तसेच तहसिलदार यांनी दि. १७/११/२००९ रोजी एमआयडीसी यवतमाळ येथे भेट देवुन सर्व्हे केला असता एकुण १३ प्लॉट खाली आढळले असुन भुखंडधारकांना नोटीसेस देण्यात आलेल्या आहे . तसेच १३ प्लॉटची सविस्तर माहिती क्षेत्र व्यवस्थापक यांनी सभेत सादर केली. तसेच मा. मध्यक्षांनी विचारले की, या करीता किती लोकांची मागणी आहे. तसेच मागणीनुसार Seniority List तयार करुन वाटप करण्यात यावे असे मा. अध्यक्षांनी सभेत सुचविले. **नविन एमआयडीसी करीता धामणगावं व बाभुळगांव रोड लगतच्या जागेचे ७/१२ करीता तहसीलदारांना पत्र देण्यात यावे. असे निर्देश मा.अध्यक्षांनी सभेत दिले..**<br><br>तसेच धामणगांव बाभुळगांव रोड लगतच्या जागेकरीता शासकीय गांव व नकाशे प्राप्त करण्यात आले असुन उर्वरीत माहिती तहसिलदार बाभुळगांव यांचे कडुन माहिती मागविली झाहे.<br><br>यवतमाळ व अतिरीक्त यवतमाळ औद्योगिक क्षेत्राकरीता भुखंडाबाबतची सद्यस्थिती.<br><br>**(१)** यवतमाळ -<br>**पाडण्यात आलेले भुखंड -**<br>**औ द्योगिक - १३४ शेड - ०६**<br>**व्यापारी - ०८ , ०६ , ०७ (SS)**<br>**निवासी - २५**<br>**२. शिल्लक भुखंड**<br>**औद्योगिक - ०१**<br>**व्यापारी- Nil, ०१ , ०६ (SS)**<br>**निवासी - ११ , शेड- Nill**<br>(<br>**शेरा- १. यवतमाळ औद्योगिक क्षेत्रात शिल्लक असलेले व्यापारी भुखंड १+६ क्षेत्रफळ ६८० चौ.मि. + ६x२४ = १४४ चौ.मि एकंदरीत क्षेत्रफळ ८२४ चौ.मि. व्यापारी भुखंडाकरीता २ अर्ज प्राप्त झालेले आहेत . औद्योगिक भुखंडाकरीता अर्ज प्रात नाहीत.**<br>**२. अतिरिक्त यवतमाळ औद्योगिक क्षेत्रात भुखंडाकरीता १० अर्ज प्राप्त झालेले असुन प्रतिक्षा सुचीवर आहेत पैकी वाटपासाठी उपलब्ध असलेल्या भुखंड क्र. बी- १५ वाटपाकरीता प्रस्ताव मुख्यालयाला सादर केलेला आहे**<br><br>**३. यवतमाळ औद्योगिक क्षेत्रातील ७ भुखंडधारकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. पेकी १ भुखंड पंचनामा अंती परत घेण्यात आलेला आहे.** असे प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, अमरावती त्यांचे पत्र क्र. २०१०२८०० दि. १४/०९/२०१० नुसार जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाला कळविले आहे.<br><br>**(ब)** एमआयडीसी कडील ४३९.८५ हेक्टरच्या उरलेल्या जमीनीमध्ये MSEB चे येणारे Thermal power station MPCB ने नाहरकत प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्यामुळे नजीकच्या भविष्यात ती जागा औद्योगिक वापरामध्ये येणे अनिश्चीत व अलीकडे महाजनकोने त्या जागी Thermal ऐवजी Solar power Station उभारण्याचा सुधारीत प्रस्ताव औ.वि.म. यांना दिल्या असलयामुळे . तसेच SEZ च्या Notified १०८ Hector च्या जागेव्यतीरीक्त इतर विकसीत केलेले १००.८५ हे.आर जमीनी व त्यावर त्वरीत लहान भुखंड MIDC मुख्यालयाने पाडावे अशा निर्णयाचे पत्र मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ,एमआयडीसी यांना मा. जिल्हाधिकारी मार्फत द्यावे असे ठरले.<br>(ब) अतिरीक्त यवतमाळ औद्योगिक क्षेत्रात लहान उद्योजकांची भुखंडाची मागणी असल्यामुळे लहान आकाराचे व काही मोठया आकाराचे भुखंड पाडण्याबाबत उपरचनाकार यांना सुचविले असुन लवकरच तसा आराखडा तयार करुन मुख्यालयास मंजुरीसाठी सादर करण्यांत येईल. असे प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.म.अमरावती यांनी त्यांचे पत्र दि.०४/०२/२०११ नुसार कळविण्यात आले आहे. कोळशावर आधारीत प्रकल्पास MPCB ने नाकारल्यामुळे आता म.रा.वि.वि.क. सोलर उर्जा प्रकल्प १०० हेक्टरवर करणार आहे . असे एमआयडीसी चे प्रादेशिक अधिकारी, अमरावती यांचे अधिका-यांने सभेत सांगीतले किती हेक्टरमध्ये उपरोक्त आराखडयास एमआयडीसी प्लॉट पाडणार आहे. या बाबतची माहिती जिल्हा उद्योग केंद्रास कळवावे असे सभेत ठरले. | **अतिरीक्त यवतमाळ औद्योगिक क्षेत्राकरीता प्लॉट मागणी चे ९ अर्ज प्रलंबित आहे व काही उद्योजकांना प्लॉट वाटप केलेले असुन ताबा देण्यात आलेला आहे.** |

| अ.क्र | मुद्या कोणी मांडला | विषय | संबंधित यंत्रणेचे नाव | (अ) दिनांक ३०.०५.२०११ पर्यंतची थोडक्यात सद्यस्थिती | निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| ८ | विदर्भ चेंबर ऑफ एसएसआय, वणी | मारेगांव ,दिग्रस ,दारव्हा येथे नविन जागा शोधनेबाबत. | प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी , अमरावती | अ) जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाकडून प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, अमरावती यांना पत्र क्र. ३७२ दि. १६/१/२००९ अन्वये कळविण्यात आले आहे. याबाबत सभेत चर्चा होऊन वणी औद्योगिक क्षेत्रात भुखंड डेव्हलप नसुन प्राप्त घटकांचे अर्ज प्रंलबित असल्याचे प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी यानी सांगितले त्या घटकांनी प्लॅाट साठी अर्ज केलेले आहेत त्यांचे अर्ज रद्य न करता प्रथम प्राधान्याने भुखंड वाटप करतेवेळी विचार करावा असे मा. अध्यक्षांनी मागील सभेत सांगितले होते.<br>**वणी औद्योगिक क्षेत्रात प्लॅाट उपलब्ध नाही असे अर्जदारांना कळविले आहे. असे प्रादेशिक अधिकारी,एमआयाडीसी यांनी सांगीतले. तसेच नविन प्लॅाट करीता वणी, मारेगाव येथे नविन जागा शोधावी तसेच दिग्रस ,दारव्हा आर्णी येथे सुध्दा नविन जागा शोधावी व MSETCL यांना सुध्दा ५ KV Load करीता २ एकर जागेची मागणी असल्यामुळे त्यांचे साठी व नविन उद्योजकांसाठी जागा शोधावी असे मा. अध्यक्षांनी सभेत सुचीत केले.**<br>महामंडळाच्या प्रचलीत नियमानुसार भुखंड वाटपाची कार्यवाही एक महिन्यात करावयाची आहे. तर भुंखड वाटपाकरीता उपलब्ध नसल्यास तसे अर्जदारास कळवुन प्रस्ताव निकाली काढल्यानंतरच पुनश्च तोच अर्ज जेष्ठता यादीमध्ये घेता येत नाही तसेच नविन जागा शोधण्याचे काम सुरु आहे. असे प्रादेशिक अधिकरी, एमआयडीसी, अमरावती त्यांचे पत्र क्र. २०१०२८०० दि. १४/०९/२०१० नुसार जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाला कळविले आहे.<br>**(ब)** दारव्हा येथे काहीही विशेष पुढाकार एमआयडीसीने घेतला नसुन या बाबत नविन जागा शोधण्याचे काम सुरु आहे. असे प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.म.अमरावती यांनी त्यांचे पत्र दि.०४/०२/२०११ नुसार कळविण्यात आले आहे<br>तसेच दारव्हा ,दिग्रस मध्ये उद्योजकांची मागणी आहे. याकरीता दिग्रस येथील मेळाव्यात ५० उद्योजकांना मार्गदर्शन केले आहे त्यापैकी १५ लोकांचे PMEGP व लघु उद्योग नोंदणी योजने अंतर्गत अर्ज तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग कैद्र, यवतमाळ यांनी सभेत सांगीतले . | मारेगाव, दारव्हा, दिग्रस , नेर येथे नविन जागा शोधावी त्याकरीता १०० एकरचे प्रस्ताव तयार करावे असे मा. अध्यक्षांनी सभेत सुचविले. तसेच दिग्रस येथे प्लॅाट उपलब्ध आहे. दारव्हा येथील प्लॅाट वाटप झालेले आहे.<br>तसेच दारव्हा येथील एमआयडीसी एरीयाची मागील जागा ही E-Class ची आहे काय याबाबत चौकशी करुन तसा अहवाल पुढील सभेत द्यावा किंवा नविन जागा शोधावी असे मा.अध्यक्षांनी सुचविले. |

| अ.क्र | मुद्या कोणी मांडला | विषय | संबंधित यंत्रणेचे नाव | (अ) दिनांक ३०.०५.२०११ पर्यतची थोडक्यात सद्यस्थिती | निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| ९ | मे. पुषावंती इंडस्ट्रीज ओ.वे. असोशिएशन पुसद | पुसद एमआयडीसी मधील कायदा व सुव्यवस्थेबाबत व पोलीस चोकी सुरु करण्याबाबत | पोलीस ठाणे ,पुसद | **(अ) पुसद एमआयडीसी मधील कायदा व सुव्यवस्थेबाबत व पोलीस चौकी सुरू करणेबाबत.**<br>**पुसद एमआयडीयी मध्ये पोलीस चौकी बांधलेली असुन ईमारतीचा ताबा द्यावयाचा आहे. पोलीस चौकीचा ताबा धेण्याबाबत प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, अमरावती यांनी मा. पोलीस अधिक्षक,यवतमाळ यांना पत्र देण्यात यावे असे मागील सभेत मा.अध्यक्षांनी सभेत सुचविले होते.**<br>**सदर पोलीस चौकी ताबयात धेण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षानी सभेत सुचविले.**<br>पुसद ओद्योगिक क्षेत्रात महामंडळाने बांधलेल्या पोलीस चौकी स्थापन करण्यात यावी व इतारतीचा रितसर ताबा मिळविण्याकरीता महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याबाबत मा. पोलीस अधिक्षक,यवतमाळ यांना या कार्यालयाचे पत्र २४५२ दि १३/०८/२०१० अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्याचेकडुन उत्तर अप्राप्त आहे. पत्र प्राप्त झाल्यावर कार्यवाही करण्यात येईल . असे प्रादेशिक अधिकारी,एमआयडीसी, अमरावती तयांचे प१ क्र. २०१०२८०० दि. १४/०९/२०१० नुसार जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाला कळविले आहे.<br>**(ब)** पुसद ओद्योगिक क्षेत्रात महामंडळाने बांधलेंल्या पोलीस चौकी स्थापन करण्यात यावी व इमारतीचा रितसर ताबा मिळविण्याकरीता महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याबाबत मा. पोलीस अधिक्षक,यवतमाळ यांना एमआयडीसी कार्यालयाचे पत्र २४५२ दि १३/०८/२०१० अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्याचेकडुन उत्तर अप्राप्त आहे. पत्र प्राप्त झाल्यावर कार्यवाही करण्यात येईल. असे म.औ.व.म ने सभेत सांगीतले.<br>यावर मा. अध्यक्षांनी असे सांगीतले की १५ दिवसात संपर्क साधुन याबाबत जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ यांना पत्राव्दारे कळविण्यात यावे | या बाबत मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यवतमाळ योचे कार्यालयाकडुन पत्र पाप्त झालेले नाही. पत्र प्राप्त झाल्यावर कार्यवाही करण्यात येईल असे म.औ.वि.म. चे अधिका-यांनी सभेत सांगीतले. |

## नाविन विषय आलेले विषय

| .क्र | मुद्दा कोणी मांडला | विषय | संबंधित यंत्रणेचे नाव | (अ) दिनांक ०७.०२.२०११ पर्यंतची थोडक्यात सद्यस्थिती (ब) दिनांक ०७.०२.२०११ च्या सभेमध्ये झालेला निर्णय | निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | एमआयडीसी औद्योगिक संघटना /विदर्भ चेबर्स ऑफ कॉमर्स असो.यवतमाळ | एमआयडीसी परिसर लोहारा व भोयर (अतिरीक्त एमआयडीसी) यवतमाळ बाबत | प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.म. अमरावती | **(अ)** १. यवतमाळ औद्योगिक क्षेत्रात एकही औद्योगिक भुखंड शिल्ल्क नाही तसेच १ व्यापारी भुखंड शिल्लक असुन त्या करीता प्रस्ताव प्राप्त झाला आहे.<br>२. ज्या भुखंडावर उद्योग सुरु केलेला नाही अशा भुखंड धारकास नोटीस देण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>३. विशेष आर्थिक क्षेत्र १०८ हेक्टर जमीनीमध्ये विकसीत करण्याचे प्रस्तावीत आहे.<br>४. अतिक्रमीत क्षेत्राच्या जागेचे सर्व्हे करण्यात यावा व .<br>५. ५% जागा महामंडळाच्या कामासाठी राखीव ठेवण्यात यावी<br>**(ब)** सदर विषय क्र. ४ व ५ असल्यामुळे हा धोरणात्मक राज्यस्तरीय उद्योग मित्र समितीला पाठविण्याचे ठरले. | सदर विषय हा राज्यस्तरीय जिल्हा उद्योग मित्र समिती कडे दि.१०/०५/२०११ ला पाठविण्यात आलेला आहे.<br>तसेच यवतमाळ औद्योगिक क्षेत्रात ST. Deptt. करीता दोन भुखंड बरेच दिवसापासुन राखुन ठेवलेले आहे .असे श्री. सुराणा अध्यक्ष. एमआयडीसी ईडस्ट्रीज असो. यानी सभेत सांगीतले. त्यावर त्यांना नोटीस देवुन कार्यवाही करुन तसा अहवाल पुढील सभेत द्यावा असे मा.अध्यक्षांनी सभेत सुचविले. |
| २ | मे. पुष्पावती इंडस्ट्रीज ओ.वे असोसीएशन पुसद | पुसद एमआयडीसी परिसरातील पाणी पुरवठयाबाबत. | उपकार्यकारी अभियंता ,एमआयडीसी | **(अ)** पुसद एमआयडीसी परिसराला मळसुर धरणावरुन स्थायी पाणी पुरवठा आहे काही कारणास्तव आपण तो डेअरीच्या विहिरीवरुन २ महिण्यापुर्वी सुरु केला ही व्यवस्था तात्पुरती असुन १५ दिवसात मुळ मरसूळ धरणाचा पाणी पुरवठा सुरु करु असे सांगितले पण आज पर्यंत मुळ स्तोत्रावरुन पुरवठा सुरु करण्यात आलेला नाही.<br>**(ब)** ७५% मोबदल्याचे वाटप SDO यांना करण्यात आले असुन पाणी पुरवठा सुरु झालेला आहे असे. म.ओ.वि.म. चे अधिका-यांनी सभेत सांगीतले. | एमआयडीसी पुसद एरीयाला सुरळीत पाणी पुरवठा सुरु आहे. काहीही अडचन नसल्याचे प्रादेशिक अधिकारी यांनी सभेत सांगीतले. |
| ३ | विदर्भ चेबर्स ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज, वणी | २५०० चोरस मिटर क्षेत्रफळापर्यतचा भुखंड जिल्हा उद्योग केंद्र यांचे मार्फत वाटप करण्याबाबत | प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.म | **(अ)** शासनाचे धोरणानुसार २५०० चौ.मि. क्षेत्रफळापर्यत भुखंड जिल्हा उद्योग केंद्रा यांचे मार्फत वाटप करावयाचे असून यापुढील क्षेत्रफळाकरीताची प्रकरणे या कार्यालयाकडुन निकाली काढावयाची आहेत. व या कार्यालयामार्फत सदर धेय्य धोरणाची पूर्णपणे अंमलबजावणी वेळोवेळी करण्यात येत आहे.<br>**(ब)** या बाबतची कार्यवाही सुरु झालेली आहे. | कार्यवाही सुरु आहे. |
| ४ | विदर्भ चेबर्स ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज, वणी | सौ.ज्योती रविद्र हनमंते यांना वणी औद्योगिक क्षेत्रामध्ये भुखंड वाटपाबाबत. | प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.म | **(अ)** वणी ओद्योगिक क्षेत्रामध्ये वाटपाकरीता भुखंड उपलब्ध नसल्यामुळे ,अर्जदारास अजुनपर्यत भूखंड वाटप करता आलेला नाही. व तसे अर्ज्रदारास कळविण्यात आलेले आहे.<br>**(ब)** याबाबत २००३ चे परिपत्रकानुसार प्लॉट उपलब्ध नसल्यास मागणी प्रलंबित ठेवता DD परत करावा असे एमआयडीसी चे धोरण आहे. ते चुकीचे असून संपादीत जमीनीवर प्लॉट पाडण्याची प्रकीया पूर्ण होईपर्यत अर्ज प्रलंबित ठेवावा जेणे करुन गरजु उद्योजकांची भुखंड मागणीची जेष्ठता कायम राहील असे सभेचे मत R.O. MIDC ने त्यांचे मुख्यालयास कळवुन याबाबत त्यांचा अभिप्राय प्राप्त करावा असे ठरले. | सदर विषय राज्यस्तरीय उद्योग मित्र समिती कडे पाठविण्याचे ठरले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | विदर्भ चेबर्स ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज, वणी | श्री. दिपक शांतीलाल बोरुदिया यांना वणी ओद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र.बी-७ चे वाटपाबाबत निवेदन | प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.म | **(अ)** प्रादेशिक अधिकारी अमरावती यांनी याबाबत त्यांचे पत्र दि.०२/१२/१० चे पत्रानुसार कहविले आहे की, वणी औद्योगिक क्षेत्रामध्ये संपूर्ण भूखंडाचे वाटप यापुर्वीच झालेले असुन भुखंड क्र. बी-७ हो पंचनामा करुन महामंडळाने ताब्यात घेतलेला आहे.<br>(ब) बी-७ हा प्लॉट पंचनामा करुन ताब्यात घेतलेला आहे व वेटींग वर ठेवलेला आहे. असे म.औ.वि.म. चे अधिका-यांनी सभेत सांगीतले आहे.<br>यावर मा. अध्यक्षाांनी नविन प्लॉट जेष्ठतेनुसार योग्य उद्योजकास देण्यात यावे असे सुचविले. | बी-७ हा भुखंड पंचनामा करुन ताब्यात घेतला आहे. सदर पलॉट हा ऑक्शन व्दारे वाटप करण्यात येईल असे प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी यांनी सभेत सांगीतले. |
| ६ | विदर्भ चेबर्स ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज, वणी | मे. जनता ऑईस फॅक्टरी ,वणी स्टॅम्प डयुटी बाबत | मुद्रांक शुल्क अधिकारी ,यवतमाळ | मे. जनता ऑईस फॅक्टरी ,वणी स्टॅम्प डयुटी मध्ये MIDC चे प्लॉट साठी केवळ स्टॅम्प डयुटी न घेता प्लॉट व इमारतीसाठी सुध्दा घेण्यात आली आहे ती योग्य नसल्याचे घटकाचे निवेदन आहे. अभिप्राय अप्राप्त आहे.<br>या बाबत DIC व MIDC ने तपासणी करुन घ्यावी व तसा अहवाल संयुक्त पणे पुढील सभेत सादर करावा असे मा.अध्यक्षांनी सुचविले. | या बाबतचा अहवाल पुढील सभेत सादर कारावा . |
| ७ | विदर्भ चेबर्स ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज, वणी | वणी एमआयडीसी क्षेत्रातील समस्या बाबत | प्रादेशिक अधिकारी, अ.ओ.वि.म. अमरावती | **(अ)** वणी येथील एमआयडीसी क्षेत्रातील उद्योजकाना भेडसावणा-या खालील समस्या<br>१. वणी एमआयडीसी क्षेत्रात नविन प्लॉट उपलब्ध करुन देणेबाबत. तसेच नविन एरीया विकसीत करण्याबाबत.<br>२. वणी एमआयडीसी क्षेत्रातील प्लॉट वेटींग लीस्ट नुसार वाटप करण्याबाबत.<br>३. वणी एमआयडीसी क्षेत्रात ईलेक्ट्रीक पुरवठा करणे बाबत.<br>४. वणी एमआयडीसी क्षेत्रात MPCB Consent मिळण्याबाबत.<br>५. वणी एमआयडीसी क्षेत्रातील प्लॉट धारक ,एमआयडीसीच्या चुकीने निर्णयाने कोर्टात जात आहे.<br>(ब) एमआयडीसी ने सदरहु मागण्यानुसार त्यांचा अभिप्राय पुढील सभेच्या अगोदर जिल्हा उद्योग केंद्र ला कळवावा असे ठरले. | सदर विषय अ.क्र. ४ नुसार चर्चा झालेली आहे |
| **८** | **राजुर लाईम मॅन्युफक्चरर आसोशिएशन** | वणी खनिज पटटयतील लाईम स्टोन व डोलामाईट बाबत | **जिल्हा खनिकर्म अधिकारी, यवतमाळ** | **(अ) या विषयाचे अनुषंगाने , जिल्हाधिकारी कार्यालय यवतामाळ यांचे पत्र क्र. गोख/रे.ह/कावि/५२/११ दि. १९ जानेवारी-२०११ नुसार कळविण्यात आले आहे की, दिनांक २७/१०/२००४ च्या शासन परिपत्रकानुसार ,खनिपटटा अंतर्गत मंजूर क्षेत्र ५.०० हेक्टर पेक्षा जास्त असल्यास केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण विभागावे साईट क्लिरन्स प्रमाणत्र आवश्यक आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार त्यांना तीन महिण्याचा कालावधीत प्रमाणपत्रा सादर करण्याबाबत सुचना दिल्या आहे.**<br>या बाबत राजूर लाईम मॅन्युफॅचरर राजुर यांनी सदर प्रमाणपत्र सादर करावे असे मा.अध्यक्षांनी सभेत सांगीतले. | या बाबत राजूर लाईम मॅन्युफॅचरर राजुर यांनी सदर प्रमाणपत्र सादर करावे असे मा.अध्यक्षांनी सभेत सांगीतले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | **उप-अभियंता (E&M) सब डिव्हीजन, एमआयडीसी, अमरावती** | म.रा.वि.वि. कंपनीने तपोना सब स्टेशन लवकर कार्यान्वीत करणे बाबत | **S.E. MSEDCL, Yavatmal** | **(अ) एमआयडीसीची गोकी येथील Jackwell ही लालखेड व साईखेड या रुरल फिडर वर असल्यामुळे १० तास भारनियमाखाली असल्यामुळे उद्योजकांना पाणी पुरवठा करण्यासाठी अडचन येते.**<br>(ब) एमआयडीसीने १२ Km चे ११ Kv चे फिडर रु. ४५ लक्ष खर्च करुन टाकले आहे. परंतु तपोना Sub station कार्यान्वीत न झाल्यामुळे त्यांची सद्यस्थीती MSEB ने लेखी जिल्हा उद्योग केंद्रास कळवावी असे ठरले. | तपोना Sub-Station कार्यान्वित न झाल्यामुळे उद्योजकांना अडचणीना तोड द्यावे लागत आहे .<br>यावर मा.अध्यक्ष, विदर्भ चेबर्स ऑफ कॉर्मसचे श्री.दर्डाजी यांनी असे सुचविले की याबाबत लोकआयुक्त यांचेकडे तक्रार केल्यास असे प्रश्न लवकर सुटतील असे सभेत सांगीतले त्यावर मा. अध्यक्षांनी याबाबत त्वरीत कार्यवाही असे सुचित केले. |
| १ | **यवतमाळ जिल्हा खनिज उद्योग ओनर्स वेलफियर असोसिशन** | Allotment of coal to Lime units | **MSSSIDC,Yavatmaal** | **लाईम उद्योगांना कोळसा शिफारसी बाबत** | शिफारस करणे सुरु आहे. |
| २ | **लघु उद्योग भारती** | Dual taxation to Industries located in the notified Industrieal Area | **प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, अमरावती, BDO,Yavatmal** | Dual taxation to Industries located in the notified Industrieal Area | ग्रा.पं. ॲक्टनुसार प्रॉपर्टी टॅक्स वसुल करण्याचा अधिकार आहे. एमआयडीसी सर्व्हीस टॅक्स घेत आहे . तरी लघु उद्योग भारती यांनी तसा परीपुर्ण प्रस्ताव सादर करावा असे अध्यक्षांनी सभेत सुचीत केले. |
| ३ | **विदर्भ चेंबर्स ऑफ स्मॉल स्केल ईडस्ट्रीज** | Availability of plot in Wani/MIDC and formation of MIDC at Pandharkawada & Ner | **प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, अमरावती** | Availability of plot in Wani/MIDC and formation of MIDC at Pandharkawada & Ner | याबाबत सदर सभेमध्ये अनु क्र.४ मध्ये चर्चील्या गेला आहे. |
| ४ | **विदर्भ चेंबर्स ऑफ स्मॉल स्केल ईडस्ट्रीज** | Express feeder at Wani/Darwha and Ghatanji, MIDC, and २२० Kv at. Wani and Pandharkawada | **प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, अमरावती** | Express feeder at Wani/Darwha and Ghatanji, MIDC, and २२० Kv at. Wani and Pandharkawada | याबाबत सदर सभेमध्ये अनु.क्र १ नुसार चर्चील्या गेला आहे. |
| ४ | **विदर्भ चेंबर्स ऑफ स्मॉल स्केल ईडस्ट्रीज** | Exemption from payment of SD/EMD to SSI unit. | **MSSIDC,** | Exemption from payment of SD/EMD to SSI unit. | या बाबत व्यवस्थापक ,MSSIDC यांनी योग्य ती कार्यवाही करावी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | **१. विदर्भ चेंबर्स ऑफ स्मॉल स्केल ईडस्ट्रीज** | Collectors`s instructon regarding reservation of Bachat Bhavan for Association work at Rs.१०००/- day | **जिल्हा उद्योग केंद्र,** | Collectors`s instructon regarding reservation of Bachat Bhavan for Association work at Rs.१०००/- day | याबाबत मागील सभेमध्ये झालेल्या निर्णया नुसार बचत भवना कडे याबाबत जिल्हा उद्योग केंद्र यांनी पत्र द्यावे असे ठरले. |
| ६ | **विदर्भ चेंबर्स ऑफ स्मॉल स्केल ईडस्ट्रीज** | Availability of fund for EDP programme. | **जिल्हा उद्योग केंद्र,** | Availability of fund for EDP programme | EDP, चे कार्यक्रम घेण्याकरीता सन- २०११-१२ करीता तरतुद प्राप्त झाली असुन २५ लाख ची जास्तीची मागणी करावी तसेच अशा कार्यक्रमामध्ये असोशिएशनचे पदाधिका-यांना बोलवावे असे मा.अध्यक्ष , विदर्भ चेबर्स यानी सभेत सुचविले. |
| ७ | **विदर्भ चेंबर्स ऑफ स्मॉल स्केल ईडस्ट्रीज** | Purchase of RCC pipe by contractor for Gov.work through MSSIDC, for ,from rate contract hoder SSI unit. | **महा. लघु उद्योग विकास महामंडळ, यवतमाळ** | **Purchase of RCC pipe by contractor for Gov.work through MSSIDC, for ,from rate contract hoder SSI unit.** | शासनाचे परिपत्रकानुसार ,MSSIDC ने कार्यवाही करावी. व संबधीतांना पत्रे पाठवावीत असे सभेत ठरले. सदर विषय हा मागील सभेमध्ये सुध्दा घेण्यात आलेला होता. |
| ८ | एमआयडीसी औद्योगिक संघटना /विदर्भ चेबर्स ऑफ कॉमर्स असो.यवतमाळ | जिल्हा उद्योग मित्र समितीमध्ये महाराष्ट्र प्रदृषण नियंत्रण मंडळ , चे अधिकारी अनुपस्थ्ीती बाबत. | **महाराष्ट्र प्रदृषण नियंत्रण मंडळ, चंद्रपुर** | जिल्हा उद्योग मित्र समितीमध्ये महाराष्ट्र प्रदृषण नियंत्रण मंडळ , चे अधिकारी अनुपस्थ्ीती बाबत | सदर सभेमध्ये महाराष्ट्र प्रदृषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी अनुपस्थीत असल्याने मा. अध्यक्ष व इतर सदस्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली. तरी पुढील सभे करीता त्यांना बालवावे असे मा. अध्यक्षांनी सुचीत केले. |

**स्वा/-**
**मा.उपजिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, यवतमाळ**

**स्वा/-**
**महाव्यवस्थापक जिउके तथा सदस्य सचिव**
**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, यवतमाळ**